FORM-1A N.C.R.B. I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154223

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र State, जिल्हा मुंबई District, पोलीस ठाणे ला.प्र.वि. Police Station, पहिली खबर क्र. 15 FIR No., वर्ष 2022 Year, दिनांक 16/3/2022 Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक, कलमे Sections 7, 7(अ)
(ii) अधिनियम Act अधिनियम १९८८, कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ........, तारीख पासून Date from 15/11/2021 वेळ Time 10:45, तारीख पर्यंत Date to 01/12/2021 वेळ Time 18:45
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 23/11/2021, वेळ Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 31/22, तारीख Date 16/03/2022 वेळ Time 15:00

4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral तोंडी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name जी/साउथ विभाग कार्यालय, मुंबई महानगर पालिका, ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place परेल, मुंबई गाव Village, पोस्ट Post, तालुका Taluka, जिल्हा Dist., राज्य State
(c) पोलीस ठाणेचे हदीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ना.म.जोशी मार्ग पो.ठाणे, तालुका Taluka, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name श्री. संतोष रमेश चव्हाण (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name रमेश चव्हाण
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 46 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9326868240
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........, दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation मेकॅनिक
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता Address : साईकृपा बिल्डींग क्र. 2/ए, 5 वा माळा, रुम नं. 503, गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No., फोन / मो. नं. Phone/Mo. No., पॅन नं. PAN No., वोटर्स नं. Card No.
रस्त्याचे नाव Road कन्नमवार नगर नं. 2, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest Identifiable place विक्रोळी (पूर्व) गाव Village, मुंबई-400083 पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn.
तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........, सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary)

① लोकसेवक जयेश विनय भिसे, वय 27 वर्षे,
② खाजगी इसम आसिफ रज्जाक शेख, वय 32 वर्षे, राही- कुर्ला (पू) मुंबई

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with OKEN Scanner

जबाब दिनांक:— १६/०३/२०२२

श्री. संतोष रमेश चव्हाण, वय — ४६ वर्षे, व्यवसाय — मेकॅनिक, रा.ठि — साईकृपा, बिल्डींग क्र २९, ५ वा माळा रूम नं ५०३, कन्नमवार नगर नं. २, विक्रोळी, पुर्व, मुंबई ४०००८३. मो नं ९३२६८६८२४०

———//———

मी वरील प्रमाणे असून, वर नमुद पत्त्यावर ३५ वर्षापासुन माझे कुटुंबासोबत रहावयास असुन माझे सोबत पत्नी नामे सौ मिना चव्हाण वय ४५ वर्षे, मुलगी नामे कु.तन्वी चव्हाण वय— २० वर्षे, कु.वैष्णवी चव्हाण वय १५ वर्षे, व मुलगा नामे कु.अथर्व चव्हाण वय १२ वर्षे असे रहावयास आहेत. माझी मोठी मुलगी नामे कु. मिना चव्हाण ही माझगाव डॉक येथे इलेक्ट्रॉनिक आय. टी. आय. चे नोकरी करत प्रशिक्षण घेत आहे. माझे "संतोष गॅरेज" या नावाचे गाळा नं २,व गाळा नं ३, एलन पापन मार्ग, मांजरेकर कंपाऊड, मुंबई १८ या ठिकाणी स्वत:चे वडीलोपार्जित मोटार सायकल गॅरेज असुन त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

माझे संतोष गॅरेज, एल एन पापन मार्ग, मांजरेकर कंपाऊंड, वरळी, मुंबई ४०००१८. या ठिकाणी गाळा नं २ व गाळा नं ३ असे दोन गाळे आहेत. गाळा नं. ०३ याचा पुर्वी पोटमाळा हा लाकडी फळयांचा होता. सदरचा पोटमाळा हा खराब झाल्याने दि. १४/११/२०२१ रोजी बदलून त्याजागी लोखंडी पोटमाळा तयार केला होता. त्यानंतर दि. १५/११/२०२१ रोजी जी/साऊथ, बी.एम.सी. परेल येथील बिल्डींग विभागातील एक कर्मचारी यांनी माझी भेट घेवून, माझे दुकानात तयार केलेला लोखंडी पोटमाळा हा बेकायदेशिरपणे बांधला आहे. त्याबाबत त्यांना ऑनलाईन तक्रार प्राप्त झालेली आहे. तरी, सदर दुकानाचे कागदपत्र घेवून त्यांनी मला त्यांचे कार्यालयात येवून भेटण्यास सांगीतले. सदर वेळी नमूद कर्मचाऱ्याने त्यांचा मोबाईल क्र. ७०२१७०८४५० हा देवून त्यावर संपर्क करून त्यांचे कार्यालयात येण्यास सांगीतले. सदरचा नंबर मी माझ्या मुलीचे मोबाईलवरील 'ट्रु कॉलर' ॲपवर चेक केले असता, सदर मोबाईल नंबर जयेश या नावाचे व्यक्तीचा असल्याचे समजले.

त्यानंतर मी दि. १७/११/२०२१ रोजी नमूद व्यक्तीस त्याचे मोबाईलवर संपर्क करून त्यांना भेटण्याकरीता जी साऊथ वॉर्ड, बी.एम.सी. परेल येथे दुसऱ्या माळयावर असलेल्या बिल्डींग डिपार्टमेंट या ऑफीसमध्ये जावून श्री जयेश यांची भेट घेवून त्यांचे दुकानाचे कागदपत्रे दाखवीली असता नमूद कर्मचाऱ्याने " तुमच्या दुकानाच्या पोटमाळयाचे काम हे बी.एम.सी.ची विनापरवाणगी केले आहे. त्यामुळे त्याच्यावर कारवाई करून ते तोडले जाणार आहे." असे सांगीतले. त्यावर मी त्यांस "मी केलेल्या पोटमाळयाचे काम हे पुर्वीचे जुने असलेले तोडून त्याजागी नविन लोखंडी बांधकाम केले आहे. त्यामुळे मी बी.एम.सी. ची कोणतीही परवानगी घेतली नाही" असे सांगीतले. त्यावर नमूद कर्मचाऱ्याने त्यांचे दुकानावर कारवाई करावयाची नसल्यास त्यास रू.३०,०००/— (तीस हजार रूपये) दयावे लागतील. अन्यथा दुकानावर कारवाई केली जाईल असे सांगीतले. त्यावर मी त्यास माझ्याकडे एवढे पैसे नसल्याचे सांगीतले असता, त्याने रू २०,०००/— एवढे त्यास दयावेच लागतील अन्यथा दुकानावर कारवाई केली जाईल असे सांगितले.

लोकसेवक श्री. जयेश यांनी रू. २०,०००/— एवढी लाचेची मागणी केली परंतु त्यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने दिनांक २३/११/२०२१ रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे तक्रार देण्याकरीता आलो. व लोकसेवकाविरोधात कारवाई करण्याकरिता तक्रारअर्ज दिला. सदर तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई करण्याकरिता सपोआ सोपान गोंधे यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांना माझी तक्रार समजावून सांगून माझा लेखी अर्ज पंचांना वाचण्यास दिल्यानंतर त्यावर पंचांच्या सहया घेण्यात आल्या व सदरचा अर्ज त्यांनी स्वत:कडे ठेवुन घेतला.

त्यानंतर दि. २४/११/२०२१ रोजी माझ्या तक्रारीची अनुषंगाने लाचेची पडताळणी करण्याचे सपोआ गोंधे यांनी ठरविले त्यानुसार पडताळणीकरिता शासकीय वाहनाने पोलीस पथक व पंचासह बी.एम.सी.(जी साऊथ वार्ड), परेल, मुंबई येथे रवाना झालो. लोकसेवक यांना भेटण्याकरिता व्हॉईस रेकॉर्डर चालु करून

Scanned with OKEN Scanner

सपोआ गोंधे यांनी मला पंचासह रवाना केले. त्यावेळी माझी "ब" लोकसेवक यांची प्रत्यक्ष भेट झाली. माझे लोकसेवकांसोबत कामासंदर्भात चर्चा झाली, सदर चर्चेदरम्यान लोकसेवक श्री. जयेश यांनी आसिफ नावाच्या व्यक्तीशी बोलुन घेण्याबाबत सांगितले. त्यावेळी त्यांनी श्री आसिफ याचा मोबाईल क्र.९८९२८०८७६६ दिला. नमुद मोबाईल क्र. प्राप्त झाल्यावर मी ब्युरो कार्यालयातील गोपनिय कक्षामधून माझ्या मोबाईल क्र. ९३२६८६८२४० वरून आसिफ यांच्या मोबाईल क्रमांक ९८९२८०८७६६ वर फोन केला व माझे मोबाईलचा स्पिकर ऑन करून सदरचे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत करण्यात आले. त्यावेळी श्री आसिफ याने मी माझ्या दुकानाच्या आत केलेल्या पोटमाळयाच्या कामासंदर्भात चर्चा होवुन आसिफ याने लोकसेवक श्री जयेश यांच्याकरिता रु.२०,०००/– इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केली. तसेच तो दि. २५/११/२०२१ रोजी माझ्या गॅरेजवर माझी भेट घेण्याकरीता येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर दि. २५/११/२०२१ रोजी खाजगी इसम श्री आसिफ यांनी मला दुपारी १५.०० वाजता गॅरेजवर भेटायला येतो असे सांगितले होते. परंतु १५.०८ वा सुमारास खाजगी इसम श्री आसिफ याने मला मोबाईलवर कॉल करून पैशाचा बंदोबस्त झाला का? याबाबत विचारणा केली असता मी पैशांची व्यवस्था करत असल्याचे सांगितले असता खाजगी इसम आसिफ यांनी तुमची पैशांची व्यवस्था झालेवर त्यांस कॉल करण्यास सांगितले.

दि. २६/११/२०२१ रोजी खाजगी इसम श्री आसिफ हा माझे गॅरेजवर येण्याची शक्यता असल्याने माझ्या गॅरेजजवळ पडताळणीचे आयोजन करण्यात आले. दि. २६/११/२०२१ रोजी १२.३४ च्या सुमारास मो/सा क्र एमएच ४६ बीडब्लू ७२९० वरून लोकसेवक जयेश, खाजगी इसम श्री आसिफ व एक अनोळखी इसम असे तिघेजण माझ्या गॅरेजजवळ आले. त्यावेळेस लोकसेवक श्री जयेश यांनी त्यांच्या मोबाईलवरून माझ्या गॅरेजच्या बाजूस असलेल्या नागोरी चहा दुकानाचे बाहेरून व आतून फोटो काढले. सदरवेळी मी श्री जयेश यांना त्यांच्या कामाचे बाबतीत विचारले असता, त्यांनी सांगीतले की तुम्ही आसिफशी बोलून घ्या. त्यावेळी श्री आसिफ याच्याशी मी बोलणे केले असता, त्याने सांगीतले की आपण सोमवारी बोलू व त्यानंतर ते मोटार वाहनावरून निघून गेले.

त्यानंतर श्री आसिफ याने मला दि.२९/११/२०२१ रोजी पुन्हा भेटतो असे सांगतले होते. त्याप्रमाणे दि. २९/११/२०२१ रोजी श्री आसिफ मला भेटण्याकरीता माझ्या गॅरेजवर येण्याची शक्यता असल्याने, खाजगी इसम नामे श्री आसिफ याची दुपारी १४.३० वाजेपर्यंत वाट पाहीली. परंतु श्री आसीफ हा नमुद दिवशी आला नाही.

दि. ३०/११/२०२१ रोजी श्री आसिफ हा मला भेटावयास येण्याची शक्यता असल्याने, माझे गॅरेज येथे कारवाई करण्याचे ठरविले. आसीफ याचा फोन आल्याने सपोआ गोंधे यांनी शर्टच्या आतील बनियनला व्हॉईस रेकॉर्डर लावुन पंचासह गॅरेजजवळ थांबलो. त्याठिकाणी आसिफ सोबत माझ्या कामाबद्दल चर्चा झाली असता श्री आसिफ याने त्याचे लोकसेवक जयेशशी बोलणे झाले असुन लोकसेवकास रक्कम रू १५,०००/– एवढी रक्कम द्यावी लागणार असल्याचे सांगीतले. " दुसऱ्या दिवशी आपण क्लिअर करून टाकू," असे सांगुन दि. ०१/१२/२०२१ रोजी त्याने मला फोन करण्यास सांगीतले.

त्यांनतर दि.०१/१२/२०२१ रोजी मी श्री आसिफ यांस कोठे भेटायचे याबाबत विचारणा करणेकरीता फोन लावला असता आसिफ याने मला बीएमसी जी साऊथ वार्ड, परेल, मुंबई येथे भेटण्याकरीता बोलावले.

समक्ष

(सोपान गोंधे)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

सं.र.चव्हाण
(संतोष रमेश चव्हाण)

Scanned with OKEN Scanner

दिनांक १६/०३/२०२२ रोजीची फिर्यादी श्री.संतोष रमेश चव्हाण यांची फिर्याद पुढे चालू.....

त्याप्रमाणे मी व सापळा पथक ११.१० वा ब्युरो कार्यालयातुन सापळापुर्व/सापळा कारवाईकरीता रवाना झालो. सपोआ गोंधे यांनी माझे शर्टच्या आतील बनियनला व्हॉईस रेकॉर्डर लावुन चालु केले. खाजगी इसम श्री आसिफ व माझी बीएमसी जी साऊथ वार्ड, परेल, मुंबई येथे गेटजवळील चहाच्या टपरीजवळ भेट झाली. श्री आसिफ व माझे कामाबद्दल बोलणे चालु असताना थोडया वेळाने लोकसेवक श्री जयेश हे सदर ठिकाणी आले असता, सदर चर्चेदरम्यान मी माझी मुलगी पैसे घेवुन येत असल्याचे लोकसेवक श्री जयेश व श्री आसिफ यांना सांगितले असता लोकसेवक श्री जयेश यांनी श्री आसिफ यास " **तु हाय ना याच्याकडून घेऊन ठेव...आणि मला तु दे...म मी त्यांना बोलून घेतो** " असे सांगितले. त्यानंतर श्री आसिफ याने रू. पंधरा हजार लोकसेवक श्री जयेश यांना लाच म्हणुन देण्यास सांगुन सदरची रक्कम मला घेवुन येण्यास सांगितले. त्यानंतर लोकसेवक श्री जयेश सदर ठिकाणाहुन निघुन गेले. ठरल्याप्रमाणे मी लोकसेवक व खाजगी इसम श्री आसीफ यांच्या प्रत्यक्ष भेटीदरम्यान झालेल्या चर्चेत माझी मुलगी कु.तन्वी चव्हाण ही घरातुन लाचेकरीता लागणारी रक्कम घेवुन येत असल्याचे सांगितले असल्याने सापळा पथकातील मपोशि नलावडे यांना तक्रारदार यांच्यासोबत माझी मुलगी म्हणुन पाठविण्याचे ठरविण्यात आले.

लोकसेवक व खाजगी इसम श्री आसीफ यांच्या प्रत्यक्ष भेटीला जाण्यापुर्वी सपोआ श्री संजु जॉन यांच्या सूचने प्रमाणे सदर ठिकाणी पंचाना व मला अँथ्रॉसिन पावडरचे गुणधर्म सांगून, प्रात्यक्षिक करुन समाजावून सांगितले. पोशि.चालक श्री.पाटील यांनी एका प्लॅस्टिकच्या डब्यातील पांढऱ्या रंगाची पावडर दाखवून ती अॅन्थ्रासीन पावडर असल्याचे व एक लहान दिवा दाखवून तो अल्ट्राव्हॉयलेट दिवा असल्याचे सांगितले. तसेच अॅन्थ्रासीन पावडर ज्या वस्तूस किंवा व्यक्तीच्या शरीराच्या कोणत्याही भागावर लावल्यास ती साध्या प्रकाशात दिसून येत नसल्याचे सांगितले मात्र पावडर लागलेली वस्तू अथवा व्यक्तीचा शरीराचा भाग अंधारात अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिल्यास त्यावर अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट हिरवट रंगाची चकाकी दिसून येत असल्याचे सांगितले.

त्यानंतर ठरल्या प्रमाणे सदरची अँथ्रॉसिन पावडर सरकारी वाहनाचे चालक श्री. पाटील यांनी लाचेच्या १५ हजार रक्कमेच्या नोटांना लावली. सदरची अँथ्रॉसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम माझे पॅटच्या डाव्या खिशात ठेवण्यास सांगितले व सदर रक्कम मागितल्याशिवाय सदर खिशास हात लावु नये याबाबत सुचना दिल्या. स.पो.आ. सोपान गोंधे यांनी पोलीस शिपाई चालक श्री. पाटील हे पुढील सापळा कारवाईत भाग घेणार नसल्याचे सांगितले.

त्यानंतर मला लोकसेवक श्री जयेश यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमे विषयी विचारणा केली असता, मी माझ्याकडे बचतीमधील शिल्लक असलेल्या रुपये ५००/– दराच्या २० भारतीय चलनी नोटा सपोआ गोंधे यांचे समक्ष हजर करुन ते रुपये १०,०००/– असल्याचे सांगुन उर्वरीत रक्कमेची सोय झाली नसल्याचे मी सांगितले. पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी माझ्याकडे रू.१५,०००/– लाचेच्या रक्कमेची मागणी झाली असल्याने माझेकडुन पुर्ण लाचेची रक्कम उपलब्ध न झाल्याने रू. १००/– दराच्या ५० खेळण्यातील नोटा असे रू. ५,०००/– वापरुन लोकसेवक श्री जयेश व खाजगी इसम श्री आसिफ यांना देण्याकरीता तयार करण्यात येणार असल्याचे ठरले. त्याप्रमाणे अन्थ्रॅसिन पावडर लावलेल्या चलनी नोटा व खेळण्यातल्या नोटा प्लास्टीकच्या पिशवीत ठेवून माझ्या पॅन्टच्या डाव्या खिशामध्ये ठेवण्यात आल्या.

तसेच लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मी तोंडावरून मास्क खाली काढुन हातात पकडावा अशा प्रकारे सापळा पथकास इशारा दयावा असे ठरले .त्यानंतर डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून पंचासमवेत लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या जवळ जाण्याकरिता रवाना झालो. त्यावेळी सापळा पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदारही विखुरलेल्या अवस्थेत लोकसेवकाचे कार्यालयाकडे आमचे मागेमाग काही अंतर राखुन निघाले. सापळा पथकाने कार्यालयाच्या अवती भवती सापळा लावला.

मी लोकसेवक यांच्या कार्यालयाजवळ जावुन खाजगी इसम श्री आसीफ याच्या मोबाईल फोनवर फोन करून मोबाईलचा स्पिकर ऑन केला व खाजगी इसम श्री आसीफ यांच्याशी बोलणे केले असता श्री आसीफ

Scanned with OKEN Scanner

यांनी मला कार्यालयाच्या बाहेरील बाजुस असलेल्या सिध्दीविनायक गारमेंट दुकानाजवळ थांबण्यास सांगितले. खाजगी इसम श्री आसिफ हा ठरल्याप्रमाणे सिध्दीविनायक गारमेंट दुकानाजवळ आला, मी त्यांना लोकसेवक श्री जयेश यांच्याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांच्या मोबाईल फोनवरून श्री जयेश यांच्या मोबाईल फोनवर फोन केला. तसेच मी त्यांना भेटण्याकरीता आल्याचे सांगितले. तसेच खाजगी इसम श्री आसिफ स्वत: लोकसेवक श्री जयेश यांचे कार्यालयात जावुन परत माघारी आला व लोकसेवक श्री जयेश हे व्हिजीट करिता बाहेर जाणार असुन ते मला भेटण्याकरीता येत नसल्याचे सांगितले. त्यानंतर श्री आसिफ व माझ्यामध्ये लाचेच्या रक्कमेच्या अनुषंगाने चर्चा झाली, मी श्री. आसिफ यांस लाचेची रक्कम घेण्यास सांगितले असता त्यांनी लाचेची रक्कम घेण्यास नकार दिला. सदरची लाचेची रक्कम ही परस्पर श्री जयेश यास देण्यास मला सांगितले. तसेच उद्या श्री जयेश व तो माझ्या गॅरेजवर येतील तेव्हा बघु असे सांगितले व मला जाण्यास सांगितले. त्यानंतर मी पोलीस पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर श्री आसीफ किंवा लोकसेवक श्री जयेश यांनी मला फोन केला नाही किंवा माझा फोनदेखील उचलला नाही. लोकसेवक याचे नाव श्री जयेश विजय भिसे व खाजगी इसम श्री असिफ रज्जाक शेख असे असल्याची माहिती मला मिळाली.

तरी मी बी.एम.सी.(जी साऊथ वार्ड), परेल, मुंबई येथील कर्मचारी श्री जयेश यांचेविरोधात रू. २०,०००/– एवढी लाचेची मागणी करीत असल्याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. २४/११/२०२१, दि. २५/११/२०२१ दि. २६/११/२०२१ दि. २९/११/२०२१, दि. ३०/११/२०२१ व दि. ०१/१२/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी/सापळा पुर्व कारवाई दरम्यान माझे दुकानात केलेल्या नवीन लोखंडी पोटमाळयावर बी.एम.सी.( जी साऊथ वार्ड), परेल, मुंबई यांचेकडुन कारवाई न करण्याकरीता व कारवाई न होवु देण्याकरीता लोकसेवक श्री जयेश यांचेवर प्रभाव पाडण्याकरीता खाजगी इसमा श्री आसीफ याने माझ्याकडे तडजोडीअंती रू १५,०००/– एवढया रक्कमेच्या लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे कबुल केले. तसेच तक्रारदार यांचेसमक्ष लोकसेवक श्री जयेश यांनी खाजगी इसम श्री आसिफ यास ''तु हाय ना याच्याकडुन घेऊन ठेव.. आणि मला तु दे... म मी त्यांना बोलून घेतो..'' तसेच '' हा याच्याजवळ दया हं..'' असे सांगुन सदरची लाचेची रक्कम घेण्यास सांगितले म्हणुन माझी लोकसेवक श्री जयेश विजय भिसे व खाजगी इसम श्री असिफ रज्जाक शेख यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई होणेस तक्रार आहे.

माझा बी.एम.सी. कर्मचारी जयेश भिसे तसेच श्री आसीफ शेख यांच्याशी यापुर्वी कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही. तसेच, माझे आणि त्यांचे कोणतेही वैमनस्य नाही.

तसेच, मला लिहीता वाचता येत नसल्यामुळे माझा जबाब स.पो.आ. गोंधे यांनी संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असुन तो मला मराठीत वाचुन दाखविला असता तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( सोपान गोंधे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

सं.र. चव्हाण
(संतोष रमेश चव्हाण)

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे — चौकशी अंती

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

खालील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील तक्रारदार यांच्या गाळ्याचा त्याकडील पोटमाळा बदलून त्याठिकाणी लोखंडी पोटमाळा बांधकाम करतेवेळी महानगर पालिकेची परवानगी न घेता बांधल्याचे कारणावरुन कारवाई न करण्याकरीता आरोपीत लोकसेवकाने खाजगी इसम नामे आसिफ शेख यांच्या मार्फतीने स्वतःच्या गैरफायद्याकरीता कायदेशीर पारिश्रमिकाशिवाय लाचेची मागणी करुन, खाजगी इसमाने लोकसेवकाकरिता तडजोडीअंती रु. २५,०००/- स्विकारण्याचे कबुल केले म्हणून गुन्हा कलम ७, ७(अ) भ्र.प्र. अधिनियम १९८८ अनुसार नोंद

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

सोपान शोधे, सहाय्यक पोलिस आयुक्त.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........., जिल्हा ........., राज्य .........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..................................................

District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

स.र. चाटाण

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ... सोपान शोधे
पदनाम Rank ... सहाय्यक पोलिस आयुक्त
तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र. विभाग, मुंबई
Posting
Code No. of I. O. ..........................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner

यावरुन फिर्यादी श्री. संतोष रमेश चव्हाण, वय ४८ वर्षे, धंदा-मॅकेनिक, राही- द्वारका बिल्डींग क्र. २/ए, ५ वा माळा, रुम नं. ५०३, कन्नमवारनगर-२ विक्रोळी (पूर्व) मुंबई-८३ यांचा स्वतंत्र पानावर जबाब नोंद करण्यात आला असून त्यास मजूर गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष,

सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

सं. र. चव्हाण

Scanned with OKEN Scanner